प्रकरण : तिसरे

# राजर्षी शाहूंची प्रशासकीय कार्यपद्धती

# राजर्षी शाहूंची प्रशासकीय कार्यपद्धती

संस्थानची एकंदरीत परिस्थिती लक्षात घेता छत्रपती शाहूंनी सावधपणे परंतु आत्मविश्वासपूर्वक आपल्या कार्यास सुरूवात केली. आपल्या पहिल्याच जाहिरनाम्यात त्यांनी जनतेला सुखी व संपन्न जीवनाची हमी देणारा आपला मनोदय स्पष्ट केला होता. कल्याणकारी राज्यकारभार करून जनतेची सर्वागीण उन्नती करणे हे त्यांच्या राज्यकारभाराचे उद्दिष्ट होते. सामान्य माणसाचे उत्थान हा त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू होता. त्यामुळे त्यांनी त्यादृष्टीने राज्यसूत्र संचलनास सुरूवात केली.

संस्थानची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीची दुरावस्था महाराजांच्या लक्षात आली होती. महाराजांना या परिस्थितीत सुधारणा घडवून आणायची होती. जनतेच्या सर्वागीण प्रगतीचा मार्ग म्हणजे शिक्षण हे शाहूंनी जाणले होते. त्यामुळे शिक्षण प्रसाराच्या माध्यमातून शाहूंनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणावयास सुरूवात केली.

शिक्षित ब्राम्हण वर्गाने प्रशासनावरती आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. शाहूंना प्रशासन भक्कम पायावर उभे करायचे होते. त्या दृष्टीकोनातून विचार केला असता एकाच वर्गाच्या हाती राज्यसूत्रे देणे त्यांना सोयीचे वाटत नव्हते. त्यासाठी त्यांनी दलित व वंचितांना शिक्षित करून प्रशासनात नोकऱ्याकरिता मोठ्या प्रमाणात संधीची उपलब्धता केली.[१]

आपली जनता कमीत कमी प्राथमिक शिक्षणाने विभूषित व्हावी असा महाराजांचा आग्रह होता. शाहू छत्रपतींनी मोठ्या अधिकाराच्या जागी ब्राम्हणेत्तरांची नेमणूक केली इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्या दिखमतीस गरीब वर्गातील लोक

१. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-IV (1900-1905), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988, Page No.-17 (Introduction)

ठेवले. हेतू हा कि गरीब लोकांच्या हितासाठी त्यांनी जे हुकूम काढले होते त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की नाही, त्यांच्याकडून कळावे. शाहूंना वाटे चांगल्या गोष्टी चांगल्या माणसांकडून कळतात आणि वाईट गोष्टी अडचणीत असलेल्या माणसांकडून कळतात.[२]

'सरकारी कामकाजासाठी तारीख व वेळ ठरविल्याशिवाय छत्रपती शाहू कुणालाही भेटत नसतं. अकरा ते बारा या एका तासाच्या वेळात शाहू लोकांना भेटत. पूर्वपरवानगीशिवाय अचानक आलेल्या लोकांना शाहू भेटत नसतं. तरी दररोज सायंकाळी साडेचार वाजता शाहू घोड्यांच्या पागेकडे जात. तिथे गोरगरीब जनतेला त्यांना भेटून आपल्या अडचणी मांडण्याची मुभा होती.

राज्यकारभारावर पूर्णत: ताबा मिळविल्यानंतर शाहूंनी पूर्वनियोजित भेटीची ही पद्धती बंद करून टाकली. तिथून पुढे कोणालाही कोणत्याही वेळी भेटण्याची मुभा त्यांनी ठेवली.[३]

सकाळच्या रपेटीच्यावेळी शाहूंचा खेडूतांशी किंवा शेतकऱ्यांशी सरळ संबंध येई. अशावेळी बोलण्या बोलण्यातून शाहू त्यांच्या गरजा व प्रश्न यांची माहिती करून घेत आणि त्या दूर करण्याचा प्रयत्न करीत.[४]

गावच्यावतीने आलेल्या शिष्टमंडळाशी शाहू चर्चा करीत. तसेच गावच्या गरजा आणि अडीअडचणी याबाबत गावकऱ्यांशी शाहू राजे साधकबाधक विचारविनिमय करीत असत. गावच्या समस्यांच्या सोडवणूकीत गावकऱ्यांना विश्वासाने सहभागी करून

---

२. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ. क्र. ५६

३. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क. ८२

४. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur. 1983 Page No.-7 (Introduction)

घेत. व्यक्तिगत तक्रारीही शाहू समजावून घेत शक्य असल्यास त्या तक्रारी दूर करण्यासाठी ते लागलीच उपाययोजना करीत.[५]

अधिकाऱ्यांच्या अहवालावर आधारलेले जनतेच्या स्थितीचे ज्ञान संपादन करण्यापेक्षा समक्ष जनतेत जाऊन तिची स्थिती, तिचे प्रश्न, तिच्या अडी-अडचणी समजावून घेणे व त्यांचे निवारण करण्याची कार्यपद्धती शाहूंनी अनुसरली.[६]

गरजू व अडचणीत असणाऱ्या माणसांना सहकार्य करण्यास छत्रपती शाहूंनी नेहमीच प्राधान्य दिले. समाजातील उच्चवर्गीय प्रस्थापितांशी समरस होण्यापेक्षा समाजातील अपंगांशी, दलितांशी आणि पददलितांशी ते बंधुभावाने झटकन समरस होत असत. दलित व पददलित समाज यांची जाचक बंधनातून मुक्तता करणे हेच त्यांच्या जीवनातील एकमेव ध्येय होते.

त्यांनी जे काही कार्य केले निर्बंध केले. त्याचा एकच उद्देश होता तो म्हणजे दलितांना आणि पददलितांना माणुसकीचे व स्वातंत्र्याचे समान हक्क देणे. त्यांना इतर समाजाच्या बरोबरीने आणणे.

शाहूंच्यादृष्टीने मूठभर पांढरपेशे म्हणजे जनता नव्हे. चिमूटभर सरदार दरकदार म्हणजे जनता नव्हे. तर घाम गाळून मोती पिकवणारी आणि स्वत:च्या रक्तांचे पाणी करून जगाला जगाविणारी, स्वत: गलिच्छ कामाचा निचरा करून इतरांची आरोग्य संपदा जतन करणारी, परस्परांना साह्यभूत होणारी, छोटी-मोठी कामे सहकाराच्या तत्त्वावर करून गावगाडा सुरळीत चालवीत असलेली अफाट जनता हीच खरी जनता.[७]

त्यामुळे त्यांनी समाजातील पददलित वर्गाविरूद्ध दृष्ट चालिरितींचे पालन करणाऱ्यांना शिक्षेची तरतूद असणारे कायदे तयार केले. त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. सामाजिक पुनर्घटनेसाठी उपरोक्त निर्बंध करून छत्रपती थांबले

---

५. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क. ८१-८२

६. कित्ता - पृ. क्र. ८१

७. कित्ता

नाहीत . आपली वाचने, आज्ञा व निर्बंध प्रत्यक्ष कृतीत उतरत आहेत की नाही हे ते स्वत: पाहत होते आणि या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास प्रसंगी कठोर शासन ही करत असत .

न बोलता, पूर्ण विचाराने आणि योजनाबध्दतेने काम करण्याची शाहूंची प्रवृत्ती होती . त्यामुळे राज्य कारभार हाती घेतल्यानंतर अनिर्णय प्रकरणांचा साचलेला ढीग उपसण्याची त्यांनी योजनाबद्ध आखणी केली .[८] दिनांक १९ एप्रिल ते ६ जून १८९४ अखेर त्यांनी या कामासाठी पन्हाळगडी मुक्काम केला . दररोज सहा प्रकरणे याप्रमाणे ६00 प्रकरणे ज्यामधील २५0 प्रकरणे पुनर्निर्णयासाठी आलेली अशी सर्व प्रकरणे त्यांनी निकालात काढली .'[९]

महत्त्वाच्या प्रकरणात सल्लागार समितीशी विचार- विनियम व सल्ला मसलत करून शाहू निर्णय होत असतं . ही सल्लागार समिती वरिष्ठ तीन अधिकाऱ्यांची असल्यामुळे त्या त्या प्रकरणाबाबत अधिकाऱ्यांची प्रशासकीय दृष्टीकोन शाहू समजून घेत . अधिकारी सहिष्णू, लोकाभिमुख व निस्पृह आहेत की नाहीत याचा ही शाहूंना अंदाज येई . सल्लागार समितीच्या अनुभवी सल्ल्यामुळे शाहूंना न्याय व समतोल निर्णय घेण्यास मदत होई . आठवड्यातून तीनदा सल्लागार समितीच्या बैठकी घेण्याचा रिवाज शाहूंनी पाडला तो याच कारणामुळे .[१०] सामान्य जनतेची उन्नती करण्याच्या प्रयत्नात प्रसंगी त्यांच्या जीवाला व गादीला ही धोका उत्पन्न झाला परंतू तरीही ते आपल्या कार्यापासून जरा ही हटले नाहीत .

राजर्षी शाहूंना समाजाची समानता असलेली समाज रचना निर्माण करावयाची होती . तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यावर

---

८ . कित्ता - पृ . क्र . ७२

९ . Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.-5 (Introduction)

१० . सुर्यवंशी कृ . गो . - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ . क . ७२

आधारलेला समाज त्यांना निर्माण करावयाचा होता. त्यासाठी त्यांची सर्व धडपड चालली होती. त्यासाठी समाज सुधारणेवर भर दिला.'

कालगतीनुसार सरंजामशाही, राजेशाही व साम्राज्यशाही यांचा अंत होणार याचे पुरेपुर भान शाहूंना होते.[११] त्यामुळेच त्यांनी लोकशाहीच्या प्रस्थापनेची पुर्वतयारीच आपल्या संस्थानात सुरू केली होती. कारण छत्रपती शाहूंच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय इ. क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की त्यांचे कार्य लोकशाहीचे होते. यावरून छत्रपती शाहू लोकशाहीचे संकल्पक होते असा म्हणता येईल.

## लोकशाही राज्याचे संकल्पक छत्रपती शाहू :

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. त्यासाठी राज्यघटना तयार करण्यात आली. २६ जानेवारी १९५० यादिवशी भारतीय राज्यघटनेचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. राज्यघटनेमध्ये लोकशाही शासन व्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे.

राज्यघटनाकारांनी लोकशाहीचा अर्थ केवळ राजकीय लोकशाही असा संकूचित दृष्टीकोनातून घेतलेला नाही. राजकीय लोकशाहीतून सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण करण्याचे उद्दिष्ट गृहित धरले आहे.

सामाजिक न्यायाच्या व समतेच्या निर्मितीसाठी घटनाकारांनी अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांसाठी घटनेत काही खास सवलती दिलेल्या आहेत. या वर्गाचा सर्वांगीण विकास व्हावा व संपूर्ण समाज समानतेच्या पातळीवर यावा हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

वरील विविध घटकांच्या व लोकशाही मूल्यांच्या अनुषंगाने विचार केल्यास छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व प्रत्यक्ष कृती लोकशाही शासनप्रणालीशी अनुरूप

---

११. कित्ता - पृ.क्र.५४८

होती हे लक्षात येते. कारण छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संपूर्ण हयातीत अव्याहतपणे सामाजिक समता निर्माण व्हावी, व्यक्ती व्यक्तीमधील उच्च नीच भेदभाव दूर व्हावेत यासाठी प्रयत्न केला. पिढ्यान् पिढ्या सामाजिक, धार्मिक गुलामगिरीच्या, वर्ण व्यवस्थेच्या आणि जातीव्यवस्थेच्या जोखडात अडकून पडलेला बहुजन समाजातील सर्व सामान्य तसेच तळागाळातील लोकांना शाहू महाराजांनी मुक्तीचा मार्ग दाखविला आणि त्यांना प्रतिष्ठा करून दिली. छत्रपती शाहूंचे जातिभेद निर्मूलनाचे हे कार्य मानवी समानतेचे होते. तसेच हे कार्य लोकशाहीचे ही होते. कारण मानवी समानता हा लोकाशाहीचा पाया असतो. लोकशाही मूल्यांच्या अनुषंगाने विचार केल्यास छत्रपती शाहू लोकशाही राज्याचे संकल्पक होते. याचा प्रत्यय येतो.

'न्याय' या संकल्पनेत समाजाचा सर्वांगीण विकास अभिप्रेत असतो. जात, धर्म, वंश, लिंग, प्रदेश याचा विचार न करता प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाची शाश्वती देण्यात आलेली असते.

महाराजांनी प्रशासन, शिक्षण, राजकारण, कला, क्रिडा इत्यादी क्षेत्रांशी संबंधित कार्य करत असताना सामाजिक, आर्थिक , न्यायाची अनुरूप असे कार्य केले.

प्रशासनामध्ये नेमणूक करताना व्यक्तीची जात, धर्म, प्रदेश या गोष्टींना महाराजांनी गौण स्थान दिले. तर व्यक्तीची त्या पदासाठी आवश्यक असणाऱ्या पात्रतेस त्यांनी प्राधान्य दिले. म्हणून महाराजांनी काही महारांची नेमणूक पोलिस खात्यातही केली. शिकलेल्या दलितांना कारकुनाप्रमाणेच शिक्षक, दप्तरदार आणि तलाठी म्हणूनही नेमून घेतले.

महाराजांच्या राजाश्रयाखाली महार, भंगी, बेरड, बुरूड अशा विविध जातीचे मल्ल होते. शिवाय महाराजांच्या पदरी सर्व प्रदेशातील आणि विशेषत: उत्तरेकडील दिल्ली, पंजाब याठिकाणचेही मल्ल होते.

मुसलमान धर्माचे गानमहर्षी अल्लादियाखाँ महाराजांच्या दरबारी होते. त्याचबरोबर अखिल भारतीय ख्यातीच्या गायिका म्हणून गणल्या गेलेल्या स्त्री गायिका

केसरबाई महाराजांच्या दरबारी होत्या. यावरून असे लक्षात येते की, महाराजांची दृष्टी जात, धर्म, प्रदेश, लिंग याच्या पलिकडची होती.

आर्थिक न्यायाच्या संकल्पनेत सर्व साधन संपत्तीचे वितरण राज्यव्यवस्था न्यायाच्या आधारे करेल असे अपेक्षित असते. त्यानुसार विचार केल्यास महाराजांनी विविध समाजाचा शिक्षणाच्या माध्यमातून विकास करण्यासाठी शाळा, वसतिगृहे स्थापन करण्यासाठी सढळ हाताने मदत केली. हि मदत करताना त्यांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मागासलेल्या लोकांचा आर्थिक स्तर उंचवावा यासाठी त्यांना प्रशासनात विविध पदावर नेमले.

राजकीय न्यायामध्ये राजकीय प्रक्रियेत सर्वांना समान संधी देऊन सर्वांनाच मतदानाचा, निवडणूक लढविण्याचा, पक्ष स्थापन करण्याचा व राजकीय पदे भूषविण्याचा अधिकार दिला पाहिजे. महाराज प्रौढमताधिकार व बहुमताच्या तत्त्वांचे पुरस्कर्ते होते हे महाराजांच्या मुंबई येथील २४ नोव्हेंबर १९१८ च्या भाषणावरून स्पष्ट होते याठिकाणी महाराज म्हणतात, "वयात आलेल्या प्रत्येक माणसास मत देण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. बहुजन समाजाच्या मनाप्रमाणेच कारभार चालला पाहिजे. अल्पसंख्यांकांची सत्ता कमी होणारच. आपणासही असेच अधिकार मिळाले पाहिजेत व त्याकरिता स्वार्थ त्यागपूर्वक सतत नेटाने प्रयत्न केले पाहिजेत.[१२]

राजकीय प्रक्रियेत मागासलेल्या समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी महाराज जातवार प्रतिनिधीत्त्वाची मागणी करताना म्हणतात, "पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्यांच्या हितसंबंधांचे रक्षण होणे शक्य नाही. याजकरिता जातवार किंवा वर्गवार मतदार संघातर्फे त्यांच्यातील प्रतिनिधी निवडून आले पाहिजेत."[१३]

१२. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.२६

१३. कित्ता - पृ.क्र.१५

समाजातील मागासलेल्या वर्गाना समाजातील प्रगत घटकांबरोबर आणण्यासाठी त्यांना विशेष अधिकार दिले पाहिजेत असे महाराजांना वाटत होते. त्यासाठीच महाराज जातवार प्रतिनिधीत्त्वाची मागणी करतात.

'स्वातंज्य' या संकल्पनेच्या अनुशंगाने विचार केला असता व्यक्तिविकासाठी व्यक्तीस्वातंज्याची आवश्यकता असते. महाराजांच्या २४ नोव्हेंबर १९१८ च्या मुंबई येथील भाषणाचा संदर्भ लक्षात घेतल्यास महाराज सकारात्मक स्वातंज्याचे पुरस्कर्ते होते असे लक्षात येते.

"वास्तविक पाहता ज्याने त्याने आपले वाजवी हक्क तेवढेच सांभाळले व दुसऱ्याचे वाजवी हक्कांस विरोध केला नाही म्हणजे तंट्यास जागा राहत नाही."[१४] यावरून असे लक्षात येते की महाराज सकारात्मक स्वातंज्याचे पुरस्कर्ते होते. व्यक्तीने आपले हक्क उपभोगताना दुसऱ्याच्या हक्कावर गदा येऊ नये असे वर्तन करावे हा छत्रपती शाहूंचा दृष्टीकोन लोकशाहीच्या स्वातंज्य संकल्पनेला अनुरूप असाच होता.

महाराजांनी विविध जाती, धर्माच्या व्यक्तींसाठी कोणताही उद्योग, व्यवसाय करण्याचे स्वातंज्य दिले. त्यासाठी २२ फेब्रुवारी १९१८ ला बलुतं बंदचा कायदा केला.' वर्षानुवर्षे एकाच धंद्यात खितपत पडणाऱ्या व्यक्तीची त्यांनी सुटका करून इतर उद्योग, व्यवसाय करण्यास त्यांना मोकळीक दिली.[१५]

अनेक अस्पृश्यांना महाराजांनी वकिलीच्या सनदा बहाल केल्या. ३० मे १९२० च्या नागपूर येथील आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "अशा वकीलीच्या सनदा देण्यात माझा हेतू एवढाच आहे की, जे धंदे अस्पृश्य वर्गास रूढीने, कायद्याने अगर दडपशाहीने बंद झालेले आहेत ते त्यास मोकळे करून द्यावेत व त्यांची स्थिती सुधारून

---

१४. कित्ता - पृ.क्र.२०

१५. Sangave Vilas - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-VIII (1918 and1919 A.D.), (Impetus to social Ligislation and Non-Brahmin Movement) Shivaji University, Kolhapur 2001 Page No.- 41 - 42

त्यांच्यात आपण इतर माणसांचे बरोबरीचे आहोत असा आत्मविश्वास उत्पन्न करावा."[१६]

जात, धर्म यांच्या बंधनाद्वारे व्यक्तीच्या अंगभूत कौशल्याला बंदिस्त करून त्याच्या कलागुणांना संकुचित करणाऱ्या प्रवृत्तींना प्रतिबंध घालून छत्रपती शाहू महाराज यांनी कोणताही उद्योग व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य देऊन व्यक्तीच्या अंगभूत गुणांना मोकळीक दिली. तसेच विशिष्ट धंद्यावरून व्यक्तीची जात ओळखली जात असे या प्रवृत्तीलाही पायबंद घालण्याचा प्रयत्न या माध्यमातून शाहूंनी केला.

साम्राज्यातील एक संस्थानिक असूनदेखील भारतीय कामगारांना आपल्या हक्कांची जपणूक करण्यासाठी संघटनेच्या मंत्राचा आदेश देताना महाराज म्हणतात "इंग्लडात मजूदारांनी आपल्या उन्नतीकरीता आपले संघ स्थापन करून स्वावलंबनाचे मार्ग स्वीकारले त्याचप्रमाणे आपण आपले सुव्यवस्थित संघ तयार केले पाहिजेत."[१७]

शाहूंचा वरील विचार लोकशाहीच्या मार्गाने संघटनेच्या जोरांवर आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचा मार्ग दाखवितो.

'समतेच्या' दृष्टीकोनातून विचार केला असता राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य व्यापक स्वरूपाचे असल्याचे दिसते.

'समता आणि बंधुता निर्माण करण्याचे जे कार्य साधू संतांनी केले ते धर्मिक पातळीवर याचा परिणाम समाजव्यवस्थेवर झाला नाही. दुर्दैवाने असेही संत होऊन गेले की, त्यांनी ब्राम्हण कितीही अपात्र असला तरी वंदनीय मानावा असा उपदेश केला."[१८]

अशा या आपल्या समाजात आधुनिक काळात समता आणि बंधुभाव निर्माण करण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी केला. महात्मा फुले यांच्या कार्याचा जणू वारसा घेऊन कोल्हापूरच्या छत्रपती शाहूंनी समता आणि बंधुभाव निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले.

| | | |
|---|---|---|
| १६. जाधव भ. बा. | - | राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ. क्र. ९५ |
| १७. कित्ता | - | पृ. क्र. १५ |
| १८. भोसले एस. एस. | - | चंदनार्थे राजर्षी शाहू, जन्मशताब्दी स्मरणिका, १९७४-७५, जिल्हापरिषदर, कोल्हापूर, १९७५ पृ. क्र. ३६ |

दलितांसाठी राजर्षींनी केलेल्या कार्याचा केवळ धावता उल्लेख केल्यास असे दिसून येते की, त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य स्वत:पासूनच सुरू केले. दलितांना पंक्तीत बरोबर घेऊन जेवणे, त्यांच्या हातचे चहापाणी सार्वजनिक समारंभाच्या ठिकाणी सर्वासमोर घेणे इत्यादी गोष्टींचा त्यांनी परिपाठ पाडला.

आपली घोड्याची गाडी हाकण्यासाठी त्यांनी दलित नेमला आणि कन्येच्या लग्नातही त्याला मिरविला. हत्तीच्या माहुताची जागा मानाची मानली जाते त्या जागेवरही दलित नेमला. संबंधित दलित सेवकांना मानाची तलवार वापरण्याचा हक्क दिला. हजेरी पद्धत बंद केली.[१९] "अस्पृश्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून नोकऱ्या दिल्या. धंदे काढण्यास ऊत्तेजन दिले. त्यांना टपालाची ने आण करण्याचे ही काम दिले.

बागा, तलाव, रूग्णालये, कचेऱ्या, राजवाडा ही सर्व हरिजनांना नि गिरीजनांना खुली केली. सरकारी दवाखान्यांना ताकीद देण्यात आली की, इतरांप्रमाणेच दलित रूग्णांची व्यवस्था झाली पाहिजे. ज्या डॉक्टरांना अथवा दायांना हे मान्य नसेल त्यांनी राजीनामे द्यावेत. सर्व सरकारी आणि खाजगी शाळांना आदेश देण्यात आले की, कोणताही भेदभाव न करता दलित विद्यार्थ्यांना वागविण्यात यावे. दलितांसाठी चालविल्या जात असलेल्या स्वतंत्र शाळा बंद केल्या. सरकारी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यात आले की, दलित कारकून असो अथवा भेटावयास आलेला कोणी दलित असो त्याच्याशी इतरांप्रमाणेच वागावे."[२०] छत्रपती शाहूंनी अस्पृश्य समाजातील दत्तोबा पोवाराची कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली होती.

तसेच महाराजांनी एखाद्याला न्याय देत असताना उच्च नीच असा भेदभाव कधीच केला नाही. कारण पुरोगामी विचारांचा गंगाराम कांबळे मराठ्यांच्या हौदाचे पाणी

---

१९. कित्ता
२०. कित्ता - पृ.क्र.३७

प्यायला हे न आवडल्याने मराठ्यांनी त्याला बेदम मारहाण केली. तेव्हा ज्यांनी मारलं त्यांना महाराजांनी अस्पृश्य मंडळीच्या समोर बोलावून घेतले. हातात घोड्याची कमची घेतली व त्या सर्वांची पाठ फोडून काढली. मराठा, हा आपल्या रक्तसंबंधांचा हा भेद महाराजांनी केला नाही."[२१]

दर्जा आणि संधीची समानता या अनुशंगाने भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या समानतेच्या संकल्पनेच्या अनुषंगाने विचार केल्यास शाहूंचे कार्य कती व्यापक स्वरूपाचे होते याचा प्रत्यय येतो.

दुर्बल घटकांना खास संरक्षण दिल्याशिवाय त्यांना इतरांबरोबर येणे शक्य नाही, याची जाणीव स्वातंत्र्योत्तर काळात राज्यकर्त्यांना व राज्यघटनाकारांना झाली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेत त्यासंदर्भात विशेष तरतूद करण्यात आली. परंतु शाहू महाराजांना स्वातंत्र्य प्राप्तीच्या आधीच ५० वर्षे याची जाणीव प्रखरतेने झाली होती. त्यांनी १९०२ साली मागासलेल्या वर्गासाठी नोकरीत ५० टक्के जागा राखीव ठेवल्या आणि अठरा पगड जातींना राज्यकारभारात शिरकाव करणारा दरवाजा खुला करून ठेवला.

आपल्या या क्रांतीकारक जाहीरनाम्याचे समर्थन करताना व त्याची न्यायाची बाजू समजावून सांगताना महाराज म्हणतात, "घरातसुद्धा आई अशक्त आणि लहान मुलांसाठी वेगळे दूध राखून ठेवते. हॉस्पिटल मधील नर्स अशक्त रोग्यांना खास टॉनिक देते. त्याच न्यायाने राज्यकारभार करताना समाजातील दुर्बल घटकांना खास न्याय द्यावा लागतो. पिढ्यान् पिढ्या अज्ञानात खितपत पडलेल्या मागास जातीतील उमेदवारांना हजारो वर्षे ज्ञानाची मक्तेदारी बाळगणाऱ्या उच्च जातीच्या स्पर्धेपासून वाचवण्यासाठीच मी ही पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद केली आहे."[२२]

२१. बागल माधवराव - श्री शाहू महाराज यांच्या आठवणी, माधवराव बागल, कोल्हापूर, १९५० पृ.क्र.२४-२५

२२. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.३९१

तसेच या धोरणाच्या संदर्भात महाराजांनी आणखी एक उदाहरण लोकांसमोर ठेवून लोकांचा या आरक्षणाच्या धोरणासंदर्भातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला.

या धोरणाच्या संदर्भाने सांगलीच्या अभ्यंकर वकीलांनी त्यांच्यावर टिका केली. तेव्हा महाराज त्यांना घोड्याच्या थट्टीत घेऊन गेले. थट्टीत लहान-थोर घोडी मोकळीच होती त्यांना चंदी देण्यासाठी त्यांनी एका जाजमावर हरभरे टाकायला सांगितले. त्याबरोबर घोडी हरभरे खायला धावत आली. धडधाकट सशक्त होती त्यांनी पुढे होऊन सारे हरभरे फस्त केले. रोडकी, अशक्त, रोगी घोडी मागेच राहिली. मग महाराज म्हणाले, "बघितलत हे अभ्यंकर? म्हणून रोग्यांना वाचविण्याकरिता तोबऱ्यात हरभरे भरून द्यावे लागतात. तीच गोष्ट मागासलेल्या जमातीची. त्यांना खास सवलती दिल्या नाहीत तर ते डोके वर कसे काढतील.[२३]

वरील उदाहरणावरून छत्रपती शाहूंच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो. तसेच त्यांच्या न्यायी प्रवृत्तीचाही प्रत्यय येतो.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय एकात्मता बंधुता या तत्त्वाचे पूरस्कर्ते होते. याचा प्रत्यय छत्रपती शाहू महाराज यांच्या भाषणाचे संदर्भ लक्षात घेतला असता येतो.

महाराजांना आपल्या देशात असणाऱ्या जातीभेदाचा प्रचंड तिटकारा होता. या भेदभावाविषयी उद्वेगाने बोलताना महाराज म्हणतात, "हिंदुस्थानात आहे त्या प्रकारचा जातीभेद पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही दुसऱ्या देशात सापडणार नाही. या विश्वात दुसऱ्या कोणत्याही ग्रहावर तरी तो सापडल की नाही या विषयी संशयच."[२४]

छत्रपती शाहूंच्या वरील विचारावरून असे लक्षात येते की महाराजांना जातीभेदाविषयी घृणा होती. हा जातीभेदाचा अमानुष प्रकार फक्त आपल्याच देशात

---

| | | |
|---|---|---|
| २३. बागल माधवराव | - | बहुजन समाजाचे शिल्पकार, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १८६६ पृ.क्र.१८ |
| २४. जाधव भ.बा. | - | राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.६५ |

आहे. यापाठीमागील कारणमीमांसा करताना हुबळी येथील १९२० रोजीच्या आपल्या भाषणात, "सनातनी ब्राम्हण मंडळींनी स्वत:स श्रेष्ठ समजून इतर वर्गास तुच्छ लेखिल्यामुळे देशाची प्रगती खुंटली, एकी नष्ट झाली, यवनांचे फावले. ब्राम्हणांनी निर्मा णकेलेल्या वर्णाश्रम उर्फ जातीयवादामुळे इंग्रजी राज्य स्थिर झाले."[२५]

इंग्रज राजवट भारतात येण्यापाठीमागील मूलभूत कारण जातीव्यवस्था हेच आहे असे महाराजांचे म्हणणे होते. त्यामुळे आपआपसातील जातीभेद विसरून राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवाहन करताना महाराज म्हणतात, "आपण सर्व हिंदी आहोत , बंधू आहोत, हिंदी प्रजानन कोणत्याही वर्णाचे असोत , कोणत्याही धर्माचे असोत ते सर्व हिंदी आहेत व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये."[२६]

वरील उद्गारावरून छत्रपती शाहू महाराज यांच्या व्यापक राष्ट्रवादी दृष्टिकोन दिसून येतो. व्यक्तीने जात धर्म या पलिकडे जाऊन समजातील वरिष्ठ वर्गाने समाजातील मागासलेल्या लोकांना आपली भावंडे समजून सम-समान हक्क देऊन वागवावे. छत्रपती शाहूंचा दृष्टीकोन त्यांच्या विचारातील पुरोगामित्त्व सिद्ध करतो.

हिंदूस्थानातील जातीभेदाचे उच्चाटन व्हावे व लोकात ऐक्य , बंधुभाव निर्माण व्हावे यासाठी महाराजांनी जपानमधील सामुराई लोक, छत्रपती शिवाजी महाराज, बादशहा अकबर यांची उदाहरणे आपल्या भाषणाच्या माध्यमातून लोकांसमोर ठेवली होती.

जपानमधील सामुराई लोकांच्या कार्याची महती विशद करताना महाराज म्हणतात, सामुराई लोकांनी जातीभेद मोडण्यासाठी पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे आपल्याकडील ब्राम्हण लोकांनी जातीभेदाचे उच्चाटन करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

---

२५. कित्ता - पृ.क्र.१०१
२६. कित्ता - पृ.क्र.८८

छत्रपती शिवाजी महाराजांच्या व बादशहा अकबर यांचा दाखले देऊन राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवाहन करताना महाराज म्हणतात, "राज्य संपादन करण्याच्या महत्त्वाकांक्षेने पूर्वी या देशात लढाया झाल्या. अकबर, शिवाजी वगैरे महात्मांचे काळी धर्म द्वेषाने कोणी लढाया करीत नसत. अकबर बादशहाच्या पदरी मराठा, रजपूत व इतर हिंदू सरदार व लढवय्ये लोक अनेक होती. विजयनगरच्या राज्याचे पदरी किंवा शिवाजी महाराज यांचे सैन्यात मुसलमानांची संख्या कमी नव्हती. या सर्वांनी स्वधर्मीयाबरोबर किंवा स्वजातीयांबरोबर लढण्याच्या प्रसंगी देखील आपले इमान कायम राखिले. अशावेळी त्यांच्या निमक हलालपणा व बंधुप्रेम चांगले प्रकारे दिसून येई."[२७]

वरील उदाहरणे लोकांसमोर ठेवण्याचा महाराजांचा इतकाच उद्देश होता की, लोकांना हे पटवून देणे की, धर्मभेदाच्या किंवा जातीभेदाच्या सबबीवर एकमेकांचा मत्सर करणे अगदी चुकीची आहे तर आम्ही आमच्या सर्व देश बांधवांना आपल्या बरोबरीचे हक्क देऊन वागविले पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेला व्यापक अधिष्ठान देण्यासाठी महाराजांनी आंतरजातीय विवाहाची संकल्पना मांडली. महाराजांचे असे मत होते की जाती-जातीत विवाह संबंध होऊ लागल्याशिवाय जातीभेदाची तीव्रता कमी होणार नाही.

यासाठी १२ जूलै १९१९ रोजी आंतरजातीय विवाह संबंधीचा कायदा करून हिंदू व जैन विवाहाला त्यांनी कायदेशीर मान्यता प्राप्त करून दिली. महाराजांनी केवळ कायदा करून, आंतरजातीय विवाहाची संकल्पना मोडून जातीद्वेष कमी करण्याचा प्रयत्न केला असे नाही तर आपल्या जनक घराण्यातील कागलकर घाटगे घराण्यातील कन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरचे यशवंतराव होळकर यांच्याशी करून दिला.

अशाप्रकारे इंदूरचे होळकर धनगर व कागलचे घाटगे क्षत्रिय मराठा यांचा विवाह जमवून आणून समाज परिवर्तनाचे, सामाजिक सुधारणाचे कार्य छत्रपती शाहू यांनी स्वत:पासून, स्वत:च्या घरापासून केले होते.

---

२७. कित्ता - पृ.क्र.८९

येऊ घातलेल्या नवीन सुधारणांना कायद्याने पाठबळ मिळाले पाहिजे अशी शाहू महाराजांची मागणी होती. म्हणून महाराज म्हणतात, "हल्ली असलेल्या हिंदू कायद्यांतही पुष्कळ दुरूस्ती झाली पाहिजे. राष्ट्रीयत्त्वाची व समाजाची कल्पना वाढलेली आहे. मिश्रविवाह, परदेशगमन, जातीभेद, परधर्मीयांविषयी सहिष्णूता वगैरे सर्व कल्पनांना पोषक असे कायदे झाले पाहिजेत व तसे नसल्यास समाजाचे गाडे अडकून राहणार आहेत."[२८]

याठिकाणी छत्रपती शाहूंचा कायद्याच्या राज्यावर असणारा विश्वास दिसून येतो. समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी ठोस कायद्याची आवश्यकता ते प्रतिपादीत करतात. तसेच मिश्रविवाह, आंतरजातीय विवाहांना प्राधान्य देण्यापाठीमागील शाहूंचा उद्देश इतकाच होता की, जो हिंदूसमाज जात, धर्म यांच्या नावावर दुभंगला गेला आहे त्यामध्ये भावनिक ऐक्य, सामंजस्यपणा निर्माण व्हावा. सर्व समाज एका समान पातळीवर येऊन जातीभेदाचे उच्चाटन व्हावे.

राष्ट्रबांधणीसाठी नीतिमान नागरिकांची गरज प्रतिपादन करताना महाराज म्हणतात, "शीलवान नागरिकांशिवाय राष्ट्र बनणे अगर उदयास येणे यागोष्टी शक्यच नाहीत. शारीरिक उन्नतीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे. परंतु केवळ शारिरीक शौर्य, वीर्य कितीही अंगात असले तरीही नीतीमत्तेची अवनति झाल्याबरोबर रोमसारखी बलाढ्य राष्ट्रेही कशी रसातळाला मिळाली हे आपण विसरता कामा नये."[२९]

राष्ट्रनिर्मितीसाठी शीलवान, नीतिमान नागरिक आवश्यक आहेत अशी शाहूंची विचारसरणी होती. महाराजांच्या मते, कोणत्याही राष्ट्राचे भवितव्य हे त्या देशातील नागरिकांच्या सुचरित्रावर अवलंबून असते. तेव्हा आपल्या देशातील सर्वांनी शील सुधारण्याचा व त्या माध्यमातून राष्ट्र बांधणीचे कार्य करावे असा उपदेश शाहू करतात.

२८. कित्ता - पृ.क्र.९०
२९. कित्ता - पृ.क्र.१०६

लोकांच्या हाती सत्ता देण्याच्या हेतूने शाहूंनी आपल्या राज्यात लोकशाहीचा दृष्टीने पाऊल टाकले होते. म्हैसूरमध्ये प्रातिनिधिक विधिमंडळ कसे चालते याविषयी त्यांनी चौकशी केली होती. १९१९ साली त्यांनी कोल्हापूर नगरपालिकेचा कारभार निवडून आलेल्या सभासदांच्या हाती दिला होता. त्या निवडून आलेल्या सभासदांमध्ये मागासवर्ग व अस्पृश्यवर्ग यांचे जातवार प्रतिनिधी निवडून आलेले होते.

शाहूंची अशी इच्छा होती की, लोकशाही पद्धतीचे राज्य कसे चालवावे व आपल्या हक्काला कनिष्ठ वर्गानी कसे जपावे याचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी ही जातवार प्रतिनिधीची पद्धत काही दिवस अनुसरावी असे ठरविले होते."[३०]

छत्रपती शाहू जेव्हा कुलकर्णी वतने नष्ट केली तेव्हा लोकशाही तत्त्वावर अधिष्ठित ग्रामपंचायती स्थापन करण्याचा मनोदय त्यांनी स्पष्ट केला होता. १९१८ च्या जुलैमध्ये त्यांनी उजगाव, कळंबे, रूकडी, चिखली आणि बावडा येथे लोकशाहीचा प्रयोग म्हणून ग्रामपंचायती स्थापन केल्या होत्या.

आरोग्य, पाणीपुरवठा व शिक्षण याबाबतीत आणि लहान सहान फौजदारी व दिवाणी प्रकरणात सत्ता ग्रामपंचायतींना दिली होती."[३१]

लोकशाही शासनप्रणाली स्थापन करण्याच्या हेतूने जणू छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले होते. कारण लोकशाहीचे यश हे लोकशिक्षणावर अवलंबून असते याची जाणीव शाहू छत्रपतींना होती.

जनतेचे शिक्षण, आपल्या राज्यात मानवी स्वातंत्र्याची केलेली घोषणा, पददलितांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी केलेले प्रयत्न, अस्पृश्यतेचे व जाती भेदाचे निर्मुलन करण्यासाठी केलेले कार्य, सामाजिक समतेसाठी दिलेला लढा, युरोपातील राष्ट्रात

---

३०. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.४३३

३१. Sangave Vilas- Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-VIII (1918 and 1919 A.D.),(Impetus to social legislation and Non-Brahmin Movement) Shivaji University, Kolhapur 1997, Page No.-168

कामगारांची राज्ये स्थापन होत आहेत. त्याच धर्तीवर आपल्याकडील कामगारांनी संघटना स्थापण्यात व कामगारांचे राज्य स्थापन व्हावे अशी अंतर्यामी इच्छा करणारा लोकनेता तसेच येणारी राजसत्ता आपल्या सर्वसामान्य जनतेच्या हाती देण्याच्या हेतूने सहकारी व स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्याद्वारे लोकांना लोकशाहीचे प्रशिक्षण देण्यासाठी केलेले कार्य या दृष्टीकोनातून छत्रपती शाहूंचे मूल्यमापन केले असता छत्रपती शाहू लोकशाही राज्याचे संकल्पक होते याचा प्रत्यय येतो.

## संदर्भ :


१. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-IV (1900-1905), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988, Page No.-17 (Introduction)

२. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२00१, पृ.क्र.५६

३. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.८२

४. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900),(Early Administrative Reforms,)Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 7 (Introduction)

५. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.८१-८२

६. कित्ता - पृ.क्र.८१

७. कित्ता

८. कित्ता - पृ.क्र.७२

९. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1984 Page No.- 5 (Introduction)

१0. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४पृ.क.७२

११. कित्ता - पृ.क्र.५४८

१२. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर,पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.२६

१३. कित्ता - पृ.क्र.१५

१४. कित्ता - पृ.क्र.२0

१५. Sangave Vilas - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VIII (1918-1919 A.D.), (Impetus to in social Ligislation and Non Brahmin Movement) Shivaji University, Kolhapur 2001 Page No.- 41-42

| | | |
|---|---|---|
| १६.जाधव भ.बा. | - | राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर,पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.९५ |
| १७. कित्ता | - | पृ.क्र.१५ |
| १८. भोसले एस.एस. | - | चंदनार्थे राजर्षी शाहू , जन्मशताब्दी स्मरणिका, १९७४-७५,जिल्हापरिषदर, कोल्हापूर, १९७५ पृ. क्र.३६ |
| १९. कित्ता | | |
| २०. कित्ता | - | पृ.क्र.३७ |
| २१. बागल माधवराव | - | श्री शाहू महाराज यांच्या आठवणी, माधवराव बागल, कोल्हापूर, १९५० पृ.क्र.२४-२५ |
| २२.पवार जयसिंगराव | - | राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.३९१ |
| २३. बागल माधवराव | - | बहुजन समाजाचे शिल्पकार, ठोकळ प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती १८६६ पृ.क्र.१८ |
| २४.जाधव भ.बा. | - | राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर,पहिली आवृत्ती, १९७१,पृ.क्र.६५ |
| २५. कित्ता | - | पृ.क्र.१०१ |
| २६. कित्ता | - | पृ.क्र.८८ |
| २७. कित्ता | - | पृ.क्र.८९ |
| २८. कित्ता | - | पृ.क्र.९० |
| २९. कित्ता | - | पृ.क्र.१०६ |
| ३०. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राज,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,२००१, पृ.क्र.४३३ |
| ३१. Sangave Vilas | - | Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VIII (1918-1919 A.D.), (Impetus to in social Ligislation and Non Brahmin Movement) Shivaji University, Kolhapur 2001 Page No.- 168 |